

**टी. सी. महाविद्यालयात आकाश निरीक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली.**

# टीसी महाविद्यालयात आकाश निरीक्षण

**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये ईडी सेलच्या विद्यमाने विद्यार्थी व नागरिकांसाठी आकाशात होणाऱ्या बदलाची व खगोल शास्त्राची माहिती देण्यासाठी भौतिकशास्त्र विभागातर्फे आकाश निरीक्षण या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये १२० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा पार पडली. या साठी प्रा. डॉ. विकास काकडे, उपप्राचार्य व भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अशोक काळंगे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. अरुण मगर, डॉ. सचिन गाडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. रजिस्ट्रार अभिनंदन शहा उपस्थित होते. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून डॉ. विजय मोहिते यांनी काम पाहिले. प्रास्ताविक डॉ. राजेंद्र काळे यांनी केले. प्रा. संदीप काकडे यांनी आभार मानले.